**सेशन केस नं. २०६/२०२१**
**निशाणी क्र. ६३/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र. ४** ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – मन्सूर बंडू तांबोळी. .
वय – ७० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त
रा. शाहूवाडी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

**सरतपास अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. पोवार**

१. मी शाहूवाडी न्यायालयासमोर राहतो. दिनांक ०३/०३/२०२१ इ।। रोजी दूपारी ०१.३० ते ०१.४५ चे दरम्यान मी घरी होतो. मला बाहेरून आवाज आला धरा-धरा, पकडा-पकडा. त्यामुळे बाहेर आलो. त्यावेळी चार पोलिस दोन इसमांचा पाठलाग करत होते. मी त्यांच्या पाठोपाठ पळत गेलो. ते संकपाळच्या लेनमधून जुन्या पोलिस लाईनकडे पळत होते. त्याठिकाणी दोन पुरूष पोलिस, एक महिला पोलिस व एका इसमांत झटापट चालू होती. त्यानंतर तेथे पोलिस आले व त्या इसमाला घेवून गेले. ते दोन पळणारे इसम आलम शेख व बैतुल शेख असे होते. मी आलम शेखला पाहिले तर ओळखू शकतो व बैतुलला ओळखू शकत नाही. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. न्यायालयातसुध्दा माझा जबाब नोंदवणेत आला होता. आता मला तो जबाब दाखविला तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **निशाणी ६४** देणेत आले.

सरतपास संपला.

**उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे श्री. बी. ए. सोनुले वकील यांचेतर्फे**

२. मी पोलिस खातेतून सेवानिवृत्त झालो आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिसांना जबाब देतेवेळी असे सांगितले नव्हते की मी पळत जावून घटना पाहिली. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेबाबत इतर लोकांकडून समजले. हे म्हणणे खरे नाही की, झटापट मी पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पोलिस स्टेशनला ये–जा असते. मी बांबळेला ओळखत

नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्व पोलिस एकाच वेळी कोर्टात जबाब देणेकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आलम शेखबाबत पेपरमध्ये बातमी आली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या बातमीतला फोटो पाहून मी त्याला ओळखू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस स्टेशनच्या आजूबाजूला शासकिय कार्यालये आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्याठिकाणी लोकांची वर्दळ असते.

३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०३/२०२१ इ।। रोजी मला कोणताही आवाज ऐकू आला नाही व मी कोठेही गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांना मदत करणेसाठी खोटी साक्ष दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात खोटा जबाब दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे श्री. घोरपडे वकील यांचेतर्फे**

४. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. आता मला माझा जबाब दाखविला. त्यातील अधोरेखित भाग "अ" वाचून दाखविला. तसे मी पोलिसांना सांगितले नव्हते. माझ्या जबाबात तसे का नमूद केले ते मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेचा साक्षीदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा जबाब पोलिसांनी नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांना मदत करणेसाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण, वा. दा.का. दा.

सदरचा जबाब माझ्यासमक्ष नोंदणीकृत करणेत आला आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by ASHISH MANOHAR PATIL
Date: 2026.08.05 16:57:16 +0530

दिनांक – ०४/०८/२०२६

**(आ. म. पाटील)**
सत्र न्यायाधीश, कोल्हापूर